Vol 4 Issue 12 June 2015

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
Golden Research Thoughts
ISSN 2231-5063 Impact Factor :3.4052(UIF)
Volume - 4 | Issue - 12 | June - 2015 Available online at www.aygrt.isrj.org

# बुऱ्हाणपूर : राष्ट्रीय एकात्मतेचे धार्मिक पर्यटन केंद्र

*लता नागनाथराव अंबेवाले*
भूगोल विभाग, खेडगी महाविद्यालय, अक्कलकोट.

Short Profile

Lata Nagnathrav Anbewale is working at Department of Geography in Kedgi College, Akkalkot .



***सारांश :***
प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये बुऱ्हाणपूर या राष्ट्रीय एकात्मतेचे धार्मिक पर्यटन केंद्र मानले जाते. या ठिकाणच्या मंदिराचे विशेषत: दोन भाग मानले जाते. एक म्हणजे हिंदु धर्मियांचे सिध्दयप्पा स्वामी आणि मुस्लिम धर्मियांचे दर्गा तर यांच्या एकत्रिकरणातून राष्ट्रीय ऐक्य कसे निर्माण होते व एकात्मतेला कशा पध्दतीने मदत होते. हे या संशोधन प्रबंधामध्ये मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे व याठिकाणी धार्मिक, सामाजिक घटकांचा अभ्यास केलेला आहे व याठिकाणी सर्वधर्म समभावाची संकल्पना जोपासताना दिसून येते. या पर्यटन स्थळाचा विकासाच्या दृष्टीकोनातून प्रत्यक्ष भेटीतून मांडलेला आहे.

## *प्रस्तावना :*

पर्यटन ही अनादी काळापासून चालत आलेली प्रक्रिया आहे. पूर्वी ग्रिक, रोमन, अरब लोक हे आपल्या व्यापार, वाणिज्य, धर्म व इतर गोष्टींसाठी जगातील अनेक भागात नवनवीन शोध घेण्यासाठी जात असे. विविधतेने नटलेल्या भारत पर्यटनीय स्थान आणि निसर्गरम्य ठिकाणांची तसेच धार्मिक स्थळांची भेटी देणे आजच्या आधुनिक काळातील शहरीकरण, स्पर्धात्मक जीवन व ताणतणावाचे तसेच लोकांना शहरी जीवनापासून दूर राहण्यासाठी भाग पडतात. म्हणून भारतात पर्यटन हे अत्यंत महत्वाचा घटक म्हणून उदयास आला आहे.

बुऱ्हाणपूर येथे विशेषत: धार्मिक तसेच राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेले पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते. कारण याठिकाणी मुस्लिमांचा दर्गा तर हिंदू धर्मियांचा धार्मिकदृष्ट्या पवित्र स्थान मानले जाते.

### उद्देश :


बुऱ्हाणपूर राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या पर्यटन स्थळांतील पर्यटकांचा सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने अभ्यास करणे.


### अभ्यासपध्दती :

सदरील पेपरच्या माहिती संकलनासाठी बुऱ्हाणपूर धार्मिक, राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या पर्यटन स्थळाला प्रत्यक्ष भेट देऊन प्रश्नावली मुलाखत घेऊन मिळालेल्या आकडेवारीचे संख्यातंत्राच्या सहाय्याने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### स्थान :

बुऱ्हाणपूर हे सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यापासून १७ किलोमीटर अंतरावर उत्तर दिशेस आहे. याचे क्षेत्रफळ ७३४ हेक्टर (७ चौकिमी) आहे. यागावाचे निरपेक्ष स्थान हे पूर्व रेखांश आहे. या गावाची उंची समुद्रसपाटीपासून ५१० मीटर आहे. मौजे बुऱ्हाणपूरची एकूण लोकसंख्या २७३७ असून अक्षवृत्त विस्तार १७०३७'३२'' उत्तर ते १७०३८'४५'' उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७६०८'३३'' व ७६०११'८'' पूर्व रेखावृत्त इतके आहे.




### बुऱ्हाणपूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

श्रीक्षेत्र अक्कलकोटपासून १४ किलोमीटर अंतरावरच हे बुऱ्हाणपूर राष्ट्रीय एकात्मेतेच प्रतीक दर्शविणारा महत्वपूर्ण तिर्थक्षेत्र आहे. दूरवरुन सहज दर्शन व्हावे अशी मंदिराची मोठी इमारत आहे. प्रवेशद्वारावरच नगारखाना आहे. हे मंदिर दोन एकर प्रशस्त जागेचे आवार पडत असलेले आहे. मंदिरासमोरील अंगणात तिर्थकुंड आहे. ते सध्या बुजविलेले आहे. तसेच जवळच हिरोड्याचे स्थान आहे. मागील बाजूस पादुका लिंग असून पूर्ण आवाराच्या पश्चिम भागास रस्त्याच्या अलिकडे मोठी बांधीव विहीर आहे. त्यास अनंततीर्थ असे नाव पूर्वीपासून आहे. मंदिराच्या उत्तर तटाच्या बाजूस नागनाथाचे मंदिर आहे. या गावाच्या नैऋत्य भागास २ किलोमीटर अंतरावर एक कुंड आणि देवीस्थानअ हो. स्थानिक लोक या स्थानास गुंडद रेवम्मा म्हणतात.

बुऱ्हाणपूर धार्मिक पर्यटन स्थळ हे मुस्लिम धार्मियांचे देखील महत्वपूर्ण धार्मिक क्षेत्र आहे. म्हणून बुऱ्हाणपूरला धार्मिक, ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक असलेले पर्यटन स्थळ मानतात.

मुस्लिम धर्मीय लोक याठिकाणी बहुसंख्य संख्येने त्यांच्या मोहरम, रमजान महिना, रमजान ईद त्यांच्या विधीला असे सण मोठ्या प्रमाणात साजरा करतात. याठिकाणी सर्वधर्मीय लोक एकत्र येतात.

## बुऱ्हाणपूर पर्यटकांचे राज्यानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | पर्यटकांचे राज्यानुसार वर्गीकरण | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र | ६० | ५६.०७ |
| २ | कर्नाटक | ३९ | ३६.४४ |
| ३ | इतर | ८ | ७.४७ |
| | एकूण | १०७ | १००% |

स्रोत : सर्वेक्षणानुसार २०१४

बुऱ्हाणपूर पर्यटकांमध्ये मुख्यतः महाराष्ट्रातून जास्तीत जास्त पर्यटकांची म्हणजे ५६.०७ टक्के लोक याठिकाणी येतात.

## पर्यटकांचे जिल्ह्यानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | पर्यटकांचे जिल्ह्यानुसार वर्गीकरण | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सोलापूर | ३५ | ३२.७ |
| २ | उस्मानाबाद | २७ | २५.२३ |
| ३ | लातूर | ३३ | ३०.८४ |
| ४ | नांदेड | ०२ | १.८६ |
| ५ | बीड | १० | ९.३४ |
| | एकूण | १०७ | १००% |

स्रोत : सर्वेक्षणानुसार २०१४

बुऱ्हाणपूर येथे येणाऱ्या पर्यटकांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील पर्यटकांची संख्या सर्वाधिक आहे ती ३२.७% एवढी आहे.

## बुऱ्हाणपूरमधील पर्यटकांच्या गर्दीचा कालावधी :

बुऱ्हाणपूरमध्ये मुख्यतः वर्षातून चार ते पाच वेळा मोठ्या संख्येने लोकांची गर्दी दिसून येते. विशेषतः हिंदु-मुस्लिम दोन्ही धर्मियांचे सण-उत्सव साजरे होतात.

१)दसरा : दसरा हा हिंदु धर्मियांचा मुख्य सण नविन दिवस मानतात. याठिकाणी १०,००० ते १५,००० लोक एकत्र येतात.
२)महाशिवरात्री : महाशिवरात्री देखील हिंदू धर्मियांचे महत्वपूर्ण सण मानला जातो.
३)गुढीपाडवा : हिंदु धर्मियांचा गुढीपाडवा हा देखील महत्वपूर्ण सण आहे. मोठ्या संख्येने लोक एकत्र येतात.
४)रमजान ईद : मुस्लिम धर्मियांचा रमजान महिना हा पवित्र महिना समजला जातो. ह्या संपूर्ण महिनाभरात मुस्लिम लोकांची तसेच हिंदू लोकांची सुध्दा मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवितात.
५)मोहरम : मोहरम देखील एक मुख्य सण मुस्लिम लोक साजरा करतात. मोहरमच्या कालावधीमध्ये पिरांची स्थापना करुन त्यांची मिरवणूक घरोघर काढली जाते. यावेळी देखील अत्यंत गर्दी होताना दिसून येते.

### पर्यटकांचे वाहतूक व्यवस्थेनुसार वर्गीकरण

| अ.क्र. | वाहनाचे गट | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मोटार सायकल | २५ | २३.३६ |
| २ | महामंडळाचे बस | ५० | ४६.७२ |
| ३ | रेल्वे | १२ | ११.७१ |
| ४ | इतर वाहने | १२ | ११.७१ |
| ५ | पायी | ०८ | ७.४७ |
| | एकूण | १०७ | १००% |

स्त्रोत : सर्वेक्षणानुसार २०१४

बुऱ्हाणपूर पर्यटन स्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांमध्ये विशेषतः महामंडळाचे बसेस हे महत्वपूर्ण ठरतात आणि सर्वात जास्त पर्यटक हे बसद्वारेच येतात. म्हणजे ४६.७२% लोक बसने येतात.

### पर्यटकांचे धर्मानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | धर्म | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | ४५ | १२.०५ |
| २ | मुस्लिम | ५० | ४६.७२ |
| ३ | बौध्द | ०५ | ४.६७ |
| ४ | ख्रिश्चन | ०२ | १.८६ |
| ५ | इतर | ०५ | ४.६७ |
| | एकूण | १०७ | १००% |

स्त्रोत : सर्वेक्षणानुसार २०१४

बुऱ्हाणपूर पर्यटनस्थळी कोणत्याही प्रकारचे धार्मिक तक्रार दिसून येत नाही. सर्वधर्म समभावाचीवृत्ती जोपासली जाते. वरील तक्त्यावरुन मुख्यतः हिंदू धर्मीय ४२.०५ तर मुस्लिम ४६.७२ टक्के लोक आढळून येतात.

### पर्यटकांचे उत्पादनानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | पर्यटकांचे उत्पादनाचे गट | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कमी उत्पादन गट रु. २०,००० | ३० | २८.०३ |
| २ | मध्यम उत्पादन गट रु. ५०,००० | ४० | ३७.३८ |
| ३ | जास्त उत्पादन गट रु. १,००,००० | २० | १८.६९ |
| ४ | अतिजास्त उत्पादन गट रु. १,२५,००० | १० | ९.३४ |
| ५ | सर्वात जास्त उत्पादन गट रु. १,५०,००० | ०७ | ६.५४ |
| | एकूण | १०७ | १००% |

स्त्रोत : सर्वेक्षणानुसार २०१४

पर्यटक व्यवसायात किंवा उत्पादनात आर्थिक घटक हा अतिशय महत्वाचा घटक म्हणून ओळखला जातो. यानुसार बुऱ्हाणपूर पर्यटन

क्षेत्राला भेट देणाऱ्या पर्यटक हा मुख्यत: मध्यम वर्गीय जास्तीत जास्त संख्या दिसून येते ४० पर्यटक होतात.

### पर्यटकांच्या उद्देशानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | उद्देश | एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | यात्रेकरु | ३० | २८.०३ |
| २ | व्यावसायिक | १८ | १६.८२ |
| ३ | मित्र / पाहुणे | १५ | १४.०१ |
| ४ | सरकारी नौकरवर्ग | ०९ | ८.४१ |
| ५ | नवस | १८ | १६.८२ |
| ६ | वारी | १७ | १५.८८ |
| | एकूण | १०७ | १००% |

स्त्रोत : सर्वेक्षणानुसार २०१४

बुऱ्हाणपूर हे पर्यटन क्षेत्र विशेषत: राष्ट्रीय एकात्मता जोपासली जाते. याठिकाणी श्रीक्षेत्र अक्कलकोट हे अत्यंत जवळ असल्याने म्हणजे १४ किलोमीटर अंतरावर असल्याने याठिकाणी येणारा पर्यटक जास्तीत जास्त यात्रेकरुच्या स्वरुपात येतात.

### मंदिर परिसरात आढळणाऱ्या सोयी सुविधा :

१)अन्नछत्र : बुऱ्हाणपूर याठिकाणी भक्तांना अन्नछत्र व्यवस्था फक्त वर्षातून दोन वेळेस पुरविले जाते. एक म्हणजे महाशिवरात्री आणि दुसरा रमजान ईद या दोन दिवशीच अन्नछत्रामार्फत प्रसादाचा कार्यक्रम वाटप होतो.
२)दुकानांची मांडणी :याठिकाणी लहान-लहान दुकानांची मांडणी आहे. उदा. नारळ, उद, धुप, हार, मुलांसाठी खेळणी अशी छोटे-छोटे दुकान मांडणी असल्याचे दिसून येते.
३)वाहतुकीच्या सोयी : याठिकाणी अक्कलकोट तालुक्यापासून एस.टी. महामंडळाच्या बसेस तसेच प्रायव्हेट वाहनाची सोय योग्य अशी आहे. पर्यटकांचे व्यवस्थितरित्या वाहतुक सुविधा होताना दिसून येते.
४)निवासाची सोय : बुऱ्हाणपूर याठिकाणी पर्यटकांना निवासाची सुविधा उपलब्ध नाही. गेल्याच चार-पाच वर्षाच्या विकास पाहिला तर येत्या चार-पाच वर्षात निवासाची सुविधा उपलब्ध होईल.

### शिफारशी :

बुऱ्हाणपूर हे राष्ट्रीय एकतेचे प्रतिक असलेले लोकप्रिय, आकर्षक स्थान असल्याने या पर्यटन स्थळाचा विकास दिवसेंदिवस होत आहे. बुऱ्हाणपूर या स्थळांचा अभ्यास करताना अनेक गोष्टींच्या उणिवा प्रकर्षाने जाणवल्या मी माझ्यामते शिफारशीमध्ये मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१)पिण्याच्या पाण्याची सोय योग्य प्रकारे नसल्याचे निदर्शनास आले.
२)नकाशाची सोय नसल्याने पर्यटकांचा त्रास जाणवतो.
३)दळणवळणाची महत्वपूर्ण सोय याठिकाणी गरजेचे आहे.
४)आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध नाही हे अत्यंत गरजेचे आहे.
५)पर्यटकांना निवासाची सोय देखील अत्यंत महत्व आहे. याकडे विशेष लक्ष देणे महत्वाचे आहे.

## संदर्भ ग्रंथ

१)श्री सिध्दयप्पा आणि बुऱ्हाणपूर क्षेत्र दर्शन : डॉ. भिमाशंकर देशपांडे
२)महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे : कुलकर्णी द.ल.
३)श्री स्वामी समर्थ : श्री. रामचंद्र चि. ढेरे

*१)डॉ.डी.जी. माने*
भूगोल विभाग प्रमुख, शिरुर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर

*२)श्री. ए.एस. शिंदे*
भूगोल विभाग, खेडगी महाविद्यालय, अक्कलकोट, जि.सोलापूर.

*३)कु. आंबेवाले लता*
भूगोल विभाग, खेडगी महाविद्यालय, अक्कलकोट, जि.सोलापूर.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org